RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On : 12 January 2016 :: Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 14 January, 2016

अजायब ✵ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : तेरा | अंक : सातवा | जानेवारी २०१६



नुतन वर्षाच्या शुभेच्छा (संदेश) 5

प्रेभू प्रेम (सत्संग) 9

सतगुरूंचे दर्शन (संदेश) 21

शब्द (सत्संग) 25

धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहीती) 34

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.



नुतन वर्षाच्या शुभेच्छा

परमसंत अजायब सिंहजी महाराजांनी नुतन वर्षाप्रारंभी संगतला दिलेला संदेश
मुंबई, महाराष्ट्र – ६ जानेवारी १९९७

सच्चे पातशाह हुजूर सावन–कृपालजींच्या प्रिय मुलांनो!

नवीन वर्षाच्या आनंदप्रसंगी माझ्या महान सतगुरूंचे पवित्र नाम आणि त्यांच्या मंगलमय व निर्मळ आठवणींसोबत मी तुम्हां सर्वांना माझ्यातर्फे खूप–खूप शुभेच्छा देत तुमचे अभिनंदन करतो. मी शुभेच्छा करतो की नुतन वर्ष तुम्हा सर्वांसाठी आनंदमय असो आणि तुम्ही सदोदीत प्रगतीच्या मार्गावर वाटचाल करीत राहोत.

प्रियजनहो! सर्व ऋषी–मुनींनी आणि पीर–पैगंबरांनी त्यांच्या काळानुसार आप–आपल्या भाषेत तसेच वाणींद्वारे आपणांस सावध केले आहे की मृत्यूरूपी ससाणा कधी आणि कोठे येऊन आपल्यावर झडप घालेल हे काही सांगता येत नाही. तो मृत्यूरूपी ससाणा लहान–मोठा, श्रीमंत–गरीब, स्त्री–पुरुष, काळा–गोरा हे पाहत नाही. त्यास आपण टाळू शकत नाही. तो कोणाची गय करीत नाही, तो कुणास घाबरतही नाही व कुणास थोडीफार सुटदेखील देत नाही. तो वेळेचा अतिशय पक्का आणि अचूक आहे. तो सुनिश्चित वेळेवर येऊन तोंड दाखवतो व आपल्या रडून आकांत करीत, आरडा–ओरडा करीत असलेल्या आत्म्याचे हरण करीत त्याच्या सोबत घेऊन जातो. गुरुवाणीत येते:

राणा राओ न को रहे, रंक न तुंग फकीर।
वारी आपो आपनी, कोऐ न बान्धे धीर।।

परमपिता कृपालजी त्यांच्या सत्संगांत नेहमीच मृत्यूचा उल्लेख करताना हा उर्दु भाषेतील शेर म्हणत:

अगाह अपनी मौत से कोई बशर नहीं।
सामान सौ बरस का पल की खबर नहीं।।

अर्थात आपण अध्यात्म मार्गावरून भटकलेले जीव मृत्यूस पार विसरलो आहोत आणि त्याच्याकडे कानाडोळा करून येणाऱ्या शतवर्षांसाठी धन–संपत्ती गोळा करीत आहोत. परंतु आपणांस कल्पनाही नाही की पुढचा श्वास आपण घेऊ शकू वा नाही.

सच्चे पातशाह सावन सांगत असत, ''ही एक आश्चर्यजनक गोष्ट आहे की आपण आपल्या नातेवाईकांना, मित्र–मंडळींना स्वत:च्या खांद्यावर उचलून स्मशानभूमीमध्ये नेऊन अग्नीच्या हवाली करून येतो, परंतु आपल्या खोडकर व कारस्थानी मनाने आपणांस कधीही यागोष्टीची जाणीव होऊ दिली नाही की एके दिवशी असा प्रसंग आपल्यावरही येईल जेव्हा आपणांस या जगाच्या भऱ्या बाजारातून अचानकपणे जावे लागेल, याजगातून कूच करावी लागेल. परंतु तो प्रसंग आपल्या ध्यानी देखील नाही.'' गुरुवाणी सांगते:

कहाँ सो भाई मीत है, देख नैन पसार। इक चाले इक चालसी सब कोई अपनी वार।।

सुफी संत फरीद साहेब सांगतात,''मृत्यूसमयी जीवाचे तुकडे–तुकडे होतात आणि हाडे कडकडतात.''

जिन्द निमाणी कढिए हड्डां कू कड़काए।

कबीर साहेब त्यांच्या वाणीमध्ये समजावतात:

तन ते प्राण होत जब न्यारे, टेरत प्रेत पुकार।
आध घड़ी कोऊ न राखत, घर ते देत निकार।।

कबीर साहेब असे देखील म्हणतात:

घर की नार बहुत हित जास्यो, सदा रहत संग लागी।
जब ऐह हंस तजी यह काया, प्रेत–प्रेत कर भागी।।

भक्त नामदेवजी या प्रसंगाचे चित्र असे रंगवतात:

मेरी मेरी कौरव करते, दुर्योधन से भाई।
बारह योजन छत्र झुले थे, देही गिरज न खाई।
सरब सोने की लंका होती, रावण से अधिकाई।
कहाँ भयो दर बांधे हाथी खिन्न में हुई पराई।।

संतांची वाणी अतिशय स्पष्ट असते. ती कधीही आपल्या अंतरात भ्रम व गैरसमज बाकी राहू देत नाही. गुरू नानक देवजी महाराज सांगतात, ''प्रियजनहो! असा गैरसमज ठेऊ नका की मृत्यू ज्योतिषास तिथीवार विचारून येईल किंवा मुहूर्त काढून येईल की, यासाठी कोणती वेळ शुभ आहे. आपण असेही समजू नका की मरण गरीबांनाच येते, राजा–महाराजांची त्यापासून सुटका होते. मृत्यूचा डंक सर्वांसाठी एकसमान असतो.''

प्रिय मुलांनो! जिथे मी आपणांस आनंद आणि उत्साहाने नूतन वर्षासाठी शुभेच्छा देतो त्यासोबत तितक्याच नव्हे तर अधिक ठाम शब्दांमध्ये आपणांस माझ्या हृदयातील भावना आणि प्रेमाने हे देखील सांगू इच्छितो की तुम्ही सावध व्हा, समंजसपणे विचार करा, मोह–माया व अज्ञानतेच्या अथांग निद्रेतून जागृत व्हा; आपले डोळे उघडून सत्य समजून घ्या. मृत्यूस सत्य आणि जगणे खोटे ही गोष्ट आत्मसात करून अशा धनाचा संग्रह करा जे आपल्या अंतसमयी आपल्या कामी येईल आणि हे जग सोडून जाताना आपल्या उपयोगी पडेल.

सर्व संतांनी या मनुष्यजन्माचा खूप महिमा वर्णिलेला आहे, कारण या मनुष्यदेहात राहूनच आपण परमात्म्यास भेटू शकतो. इतर योनींमध्ये ही सवलत नाही. कबीर साहेब ही गोष्ट अशारीतीने सांगतात:

जिस देही को सिमरे देव, सो देही भज हर की सेव।
भजो गोबिंद भूल मत जाओ, मानस जन्म का ऐही लाहो।।

गुरू अर्जुन देवजी महाराज ही गोष्ट अशी समजावतात:

लख चौरासी जून सवाई, मानस को प्रभ दी वड़ियाई।
इस पौड़ी ते जो नर चूके, सो आए जाए दु:ख पायेदां।।

आणखी एका जागी गुरू साहेब हीच गोष्ट अशारीतीने सांगतात:

भई प्राप्त मानुष देहुरिया, गोविंद मिलन की एह तेरी बरिया।
अवर काज तेरे किते न काम, मिल साध संगत भज केवल नाम।।

प्रिय मुलांनो! मी आपणांस हे सर्व नेहमीच सत्संगामध्ये सांगत असतो. परंतु आज अतिशय ठाम शब्दांमध्ये मी याचा पुनरूच्चार करीत आहे, जेणेकरून तुम्ही याचा अर्थ समजून घ्यावा आणि त्यावर अंमलबजावणी करण्यास सुरूवात करावी.

प्रियजनहो! माझ्या अंत:करणाचा भाव समजून घ्या, माझ्या हृदयातील भावनांची कदर करा, माझ्या शब्दांना तुमच्या जीवनाचे ध्येय बनवा. तुम्ही तुमचा अधिकाधिक वेळ ध्यान-अभ्यासामध्ये व्यतीत करा, जेणेकरून मला आराम मिळेल. माझ्या महान गुरूंनी जी मला जबाबदारी दिलेली आहे ती पूर्ण करण्यासाठी तुम्ही मला मदत करा. तुम्ही देखील त्या दोन्ही महान संत-महात्म्यांची प्रसन्नता आणि कृपा प्राप्त करून घ्या.

प्रियजनहो! ही वेळ पुन्हा येणार नाही आणि या वेळेसाठी नंतर तुम्ही डोळे चोळून-चोळून रडाल, पश्चाताप कराल. मी तुम्हांस यापेक्षा अधीक काय सांगू व कसे समजावू? तुम्ही माझ्या अंत:करणातून निघालेली संवेदना आणि विनंती ऐका. माझ्या शब्दांचा खरा अर्थ समजून घ्या आणि आजपासूनच व या क्षणापासूनच दृढनिश्चय करून ध्यान-नामस्मरणात जुटा.

जर आपली कमाई नेक असेल, जीवन स्वच्छ-निर्मळ असेल, गुरूंवर पूर्ण विश्वास असेल, तर ध्यान-अभ्यासाचा रंग तुमच्यावर लवकर चढेल. या! आजपासूनच आक्रमण करा व गुरू दरबाराच्या दिशेने वाटचाल सुरू करा. गुरूंची प्रसन्नता प्राप्त करा आणि आपला लोक-परलोक पावन करा.

आपली पादत्राणे स्वच्छ करणारा



***

प्रभू प्रेम

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, गुरू रामदासजी महाराजांची वाणी, संत बाणी आश्रम, १६ पी.एस. राजस्थान – २४ डिसेंबर १९८८

बंधुंनो! परमात्मा नेहमीच संत–महात्म्यांना या संसारात पाठवित असतो. या संसारात परिपूर्ण संत–महात्मा उपस्थित नाहीत असे कधीच घडत नाही. कबीर साहेब सांगतात,''आकाशास आग लागली असून त्याचे निखारे खाली पडत आहेत. या संसारात जर संत नसते तर हा संसार जळून खाक झाला असता.'' आपणांस कल्पना आहे की, येथे ईर्षा तसेच द्वेषभावनेच्या स्वरूपातील अग्नी किती पसरलेला आहे. त्या अग्नीमध्ये मनुष्य एखाद्या वाळलेल्या बांबूप्रमाणे जळून राख होत आहेत.

प्रियजनहो! महात्मा संसारात येऊन आपल्या अंतरात परामात्म्याप्रती तळमळ, परमात्म्याप्रती प्रेम निर्माण करतात. महात्मा संसारात वर्तमानात अस्तित्वात असलेल्या सतगुरुंचा महिमा वर्णितात, कारण तेच आपणांस खऱ्या शब्द–नामाशी जोडू शकतात. वर्तमानात अस्तित्वात असलेल्या तीन–चार गोष्टी आपल्या उपयोगी पडतात. हयातीत असलेले शिक्षकच आपल्या मुलांना शिक्षण देऊ शकतात. भलेही भूतकाळात होऊन गेलेले एखादे शिक्षक खूप हुशार असतील परंतु ते जर हयातीत नसतील मग जरी अशा शिक्षकांची आपण कितीही प्रेमाने आठवण काढली की, त्यांनी आपल्या मुलांस शिक्षण द्यावे, तरीदेखील ते येऊन शिकवू शकणार नाहीत. सध्या हयातीत असलेले शिक्षकच शिक्षण देऊ शकतात.

या संसारात खूप तज्ज्ञ, विद्वान, डॉक्टर जन्मास आले जे मृतासदेखील जिवंत करू शकत होते. मनुष्य कितीही मृतावस्थेत पडलेला असला तरी त्यास काही वेळेकरीता का होईना, ते जिवंत करीत. लुकमान धन्वंतरीसारखे अनेक तज्ज्ञ वैद्य होऊन गेले. परंतु आज जर आपण आजारी असल्यास, आपला लुकमान धन्वंतरीवर कितीही विश्वास असला तरीही ते येऊन

आपल्याला औषध देऊ शकणार नाहीत. त्यामुळे आपणांस सध्या हयातीत असलेल्या डॉक्टरकडे जाणे गरजेचे असते, जेणेकरून तो आपणांस योग्य औषधे देऊन आपला आजार दूर करील.

याचप्रमाणे हयातीतील पतीची गरज असते. अनेक मोठ–मोठे, सद्‌गुणी राजे–महाराजे भूतकाळात होऊन गेले. हिंदुस्थानमध्ये राजा विक्रमादित्य अतिशय धर्मात्मा राजा होता. वर्तमानामध्ये जर एखादी तरुणी म्हणाली की 'मला विक्रमादित्य राजाशीच विवाह करावयाचा आहे व त्याच्या प्राप्तीसाठी त्या तरुणीने कितीही व्रतवैकल्ये केली, पुण्या–दान केले, तरीही तो राजा पुन्हा येणे शक्य नाही. तो येऊन तिच्याशी विवाह करून अपत्य जन्मास घालू शकणार नाही. त्यासाठी तिला वर्तमानातील पतीचीच गरज आहे.

प्रियजनहो! वर्तमानातील वस्तुच आपल्या गरजा पूर्ण करू शकतात. याचप्रमाणे भुतकाळामध्ये अनेक महात्मे होऊन गेले. ते खूप सद्‌गुणी आणि पवित्र होते. आपल्या अंत:करणामध्ये त्यांच्याप्रती खूप आदरभाव व सन्मान आहे. त्यांच्या काळी त्यांनी लोकांना शब्द–नामाचा उपदेश केला. परंतु आज जर आपण असा हट्ट धरून बसलो की त्याच महात्म्यांनी मला नाम द्यावे व मला तारावे; तर असे होऊ शकत नाही कारण आपणांस नाम केवळ वर्तमानातील महात्माच देऊ शकतात. आपल्या अंत:करणात सर्व महात्म्यांप्रती आदरभाव, सन्मान व प्रेम आहे. आपण कोणाचीही निंदा करीत नाही आहोत.

याचप्रमाणे वर्तमानातील न्यायाधिशच आपल्या केसचा निर्णय करू शकतो. आपण जर असे म्हटले की भूतकाळातील एखादा राजा अतिशय न्यायी होता. त्यानेच माझा न्याय–निवाडा करावा तर तसे होऊ शकत नाही. भलेही आपण त्याच्या फोटोसमोर कितीही धूप दिला, दिवा–बत्ती करून प्रार्थना करीत राहिलो की तूच आमचा न्याय–निवाडा कर; तरी तो येणारही नाही व आपला न्याय–निवाडा करणारही नाही. त्यामुळे आपणांस वर्तमानातील न्यायाधिशांकडेच जावे लागेल.

याचप्रमाणे आपल्या अंतरामध्ये जर नाम जपण्याची तीव्र इच्छा प्रभूप्राप्तीची तळमळ असल्यास आपलेदेखील कर्तव्य आहे की आपण वर्तमानातील महात्म्यांद्वारे शब्द–नाम प्राप्त करून अंतर्यात जावे आणि स्वत: सत्य पहावे. त्यामुळे आपल्या लक्षात येईल की जेवढे महात्मे आजपर्यंत या संसारात आले, त्या सर्वांचा शब्द–नामाचाच संदेश होता.

'गुरु–ग्रंथ साहेब' हा ग्रंथ अध्यात्मिक ज्ञानाचे भांडार आहे. या ग्रंथात सच्चखंडास, ईश्वर–धामास पोहोचलेल्या परम–संतांच्या वाणींचा समावेश केलेला आहे, ज्या काळजीपूर्वक समजावून घेण्यासारख्या आहेत. अगोदर मी प्रेमींसाठी गौडी रागामधील वाणींवर अनेक सत्संग केले होते, ज्यांचा संतमतानुसार जीवनाची वाटचाल करणाऱ्या श्रद्धाळूंना खूप फायदा झाला. आता मी सारंग दी वार यावर सत्संग करीत आहे. ह्या वारा गुरु ग्रंथ साहेब या ग्रंथात नमूद आहेत. गुरु रामदासजी महाराज ह्या वारांमध्ये त्या कर्मकांडांचा उल्लेख करतात जे आपण महात्मांनी देहत्याग केल्यानंतर करतो व त्यांस मुक्तीचा मार्ग समजतो. गुरूसाहेब तऱ्हेतऱ्हेने आपले हे भ्रम दूर करतात आणि समजावतात की मुक्ती शब्द–नामातच आहे.

प्रियजनहो! महात्मा या संसारात परमात्म्याच्या आदेशाने येतात आणि परमात्म्याच्या आदेशानुसारच जातात. या जगात गरजेपेक्षा एखादा तासही अधिक राहण्यासाठी ते राजी नसतात. कारण हे जग दु:खाने भरलेले आहे. महात्मे त्यांच्या सेवकांनादेखील हेच सांगतात की, ''प्रियजनहो! हे आपले घर नाही, हे आजारांनी भरलेले परके घर आहे. तुम्ही येथून निघण्याची तयारी म्हणजे शब्द–नामाची कमाई करा.''

आपल्या पित्या परमात्म्याचे घर प्रेमाने ओथंबलेले असून ते आपले खरे घर आहे. तेथे जाणारा मार्ग नामाने तेजोमय झालेला असून, त्यास सूर्य–चंद्र प्रकाशित करीत आहेत. आपले पिता सतगुरु प्रेमाचे सागर आहेत. ज्या वस्तू आपल्यासोबत राहणारच नाहीत त्या वस्तूंवर आपण का प्रेम करावे?

ज्या वस्तूंवर आपण प्रेम करतो, त्या वस्तू जेव्हा आपल्यापासून दुरावतात, तेव्हा आपल्या पदरी नैराश्याशिवाय दुसरे काहीच पडत नाही. तर मग आपण त्या स्वगृही पोहोचण्याचा प्रयत्न का करू नये व शब्द–गुरूंशी प्रेम का करू नये जे आजही आपल्या सोबत आहेत व यापुढेही आपल्या सोबतच राहतील.

प्रियजनहो! संतांचा संसारात देह धारण करून येण्याचा उद्देश आपल्या शिष्यांमध्ये उत्साह निर्माण करून त्यांना शब्द–नामाशी जोडण्याचाच असतो. स्वत: परिपूर्ण असूनही ध्यान–अभ्यास करून ते शिष्यांना प्रात्यक्षिक करून दाखवितात की अशाप्रकारे ध्यान–अभ्यास केल्यास तुम्हीदेखील परिपूर्ण होऊ शकता. या संसारात येण्यामागे त्यांचा यापेक्षा आणखीन वेगळा कोणताही हेतु नसतो. त्यांचे काम निद्रावस्थेत असलेल्या आत्म्यांना प्रभु प्रेमात जागृत करण्याचेच असते. गुरू अंगददेवजी महाराज सांगतात.

गुरु कुंजी पाहू निवलु मनु कोठा तनु छति।
नानक गुरु बिनु मन का ताकु न उघड़ै, अवर न कुंजी हथि।।

आपण सांगता की आपले मन एखाद्या घरासमान असून त्यावर शरीररूपी छत आहे. या घरास ईर्षा आणि द्वेषाच्या खिडक्या आहेत. आपल्या नेत्रांमागे भक्कम पोलादी दरवाजाआड परमात्मा बसलेला आहे. त्या दरवाजाची चावी सतगुरुंकडे आहे. तेच हा दरवाजा उघडू शकतात. अशी चावी असलेले महात्मा सदैव या संसारात परमात्म्याच्या आदेशाने येत असतात.

ज्याप्रमाणे कबीर साहेब आणि दहा गुरू या संसारात आले. त्याचप्रमाणे आपले सतगुरु महाराज सावन सिंहजी व महाराज कृपाल सिंहजी देखील त्याच श्रेणीतील महात्मा होते, ज्यांनी संसारात येऊन निद्रावस्थेतील आत्म्यांना नामाचे अमृत पाजून जागृत केले. महात्मा या संसारात एखाद्या खास जाती–जमाती वा धर्मासाठी येत नाहीत. ते सकल जगाकरीता येत असतात. ते सर्व जगास आपले घर मानतात आणि सर्वांवर प्रेम करतात. महात्मा प्रेमाची मूर्ती असतात.

गुरु कुंजी पाहू निवलु मनु कोठा तनु छति।
नानक गुर बिनु मन का ताकु न उघड़ै, अवर न कुंजी हथि।।

आपण सांगत आहात,''तुम्ही मन–बुद्धीच्या मदतीने तो पोलादी दरवाजा उघडण्याचा कितीही प्रयत्न केला तरी तो उघडू शकणार नाही कारण तो पोलादी दरवाजा उघडण्याची इतर कुणाकडेही चावी नाही. जेव्हा कधी आपल्या अंतरातील आडपडदा उघडला व आपणांस परमात्म्याशी भेट घेण्याचे सौभाग्य प्राप्त झाले, ते कोणत्या ना कोणत्या संत–सतगुरुंद्वारेच शक्य झाले.

प्रियजनहो! याचे आकलन आपणांस असेही होऊ शकते की विद्या मुलाच्या बुद्धीमध्ये असते व त्याची चावी शिक्षकाकडे असते. शिक्षक आपल्या योग्यतेने व चातुर्याने मुलाच्या अंतरातील विद्या जागृत करतात. जो विद्यार्थी मेहनती असतो, त्या विद्यार्थ्याकडे शिक्षक अधिक लक्ष देतात. त्याचप्रमाणे जो शिष्य स्वत:चे पावित्र्य राखतो, जास्त मेहनत करतो, सतगुरुदेखील अशा शिष्याकडे अधिक दयादृष्टी ठेवतात.

न भीजै रागी नादी बेदि।। न भीजै रागी नादी बेदि।।

महात्मा आपणांस सांगतात की सामान्यत: आपण आदर्श ठिकाणी जाऊन राग गातो, वाद्ये वाजवितो आणि धर्मग्रंथांचे पठणही करतो. हे सर्व आपण परमात्म्याच्या प्राप्तीसाठी करीत असतो. परंतु जे महात्मा अंतरामध्ये जाऊन परमात्म्यास भेटले आहेत, ते आपणांस सांगतात की प्रियजनहो! पठण करणे वाईट नाही, परंतु तुम्ही विचारपूर्वक पठण करा. राग गायनाने वा वेदांचे विचार श्रवण केल्याने परमात्मा प्रसन्न होत नाही.

मी सांगत असतो की बाह्य राग–रागीणींमुळे आपले मन धुंद होते, परंतु अंतरातील राग–रागीणींमुळे आपला आत्मा धुंद होतो. ज्याप्रमाणे नभामध्ये ढग पाहून मोर आनंदाने नाचू लागतात, त्याचप्रमाणे शब्दाचा आवाज ऐकून आत्मा प्रसन्न होऊन नाचू लागतो. बाहेरील सर्व राग आपल्या अंतर्यातील रागांची नक्कल आहेत. सत्य आपल्या अंतर्यात आहे.

जे अंतर्यात जाऊन शब्दाचा राग श्रवण करतात,ते बाह्यरागाच्या श्रवणाने धुंद होत नाहीत. किंबहुना ते तर असा विचार करतात की बाह्य राग श्रवण करण्यात आपण आपला वेळ का वाया घालवावा?

सावन सिंहजी महाराजांच्या आश्रमासमोर काही तामसी स्वभावी लोकं वाद्ये वाजवित कीर्तन करीत आणि म्हणत, परमात्मा प्राप्तीचा तुमचा मार्ग अयोग्य असून आमचा मार्गच योग्य आहे. संतांच्या अंतरात खूप नम्रता व सहनशक्ती असते. ते त्यांच्या निंदकांवरही प्रेम करतात. हे सर्व गुण महाराज सावन सिंहजींच्या अंतरामध्ये होते. ते प्रेमाची साक्षात मूर्ती होते. ते त्यांच्या विरोधकांना म्हणत की तुम्हांस जेवणा-खाण्याची अडचण होत असल्यास, येथे गुरूंचा लंगर आहे. तुम्ही लंगरमध्ये अन्नग्रहण करीत जा. ते असेदेखील म्हणत की, ''निद्रावस्थेतील परमात्म्यास जागृत करणारे आले आहेत. परंतु परमात्मा सदैव जागृत असतो. तो कधीही झोपत नाही.'' कबीर साहेब सांगतात:

मुल्ला मनारे क्या चढ़े साईं न बहरा होए।
जां कारण तूं बांग दे दिल ही भीतर जोए।।

ज्या परमात्म्यासाठी तू उंच ठिकाणी चढून मोठ-मोठ्याने बांग देत आहेस, परंतु तो परमात्मा तर तुझ्या हृदयात आहे. तो तुझा आवाज ऐकत आहे, तो बहिरा नाही. तू एखादा विचार करण्यापूर्वीच तो तुझा विचार ऐकतो.

आम्ही परेड करीत असताना कधी–कधी महाराज सावन सिंहजींच्या दर्शनासाठी जात असू. सैन्यामधील बिनतारी यंत्रणा खूप अत्याधुनिक आहे. आमच्या गळ्यापाशी मायक्रोफोन लावलेले असत. ते मायक्रोफोन आमच्या फुप्फुसांचा आवाज प्रतिध्वनित करीत असत. महाराज सावन सिंहजी हसून म्हणत,''प्रियजनहो! तुमच्या अंतरात अशीही एक शक्ती आहे, जी तुमचा आवाज मायक्रोफोन लावल्याशिवाय देखील ऐकत आहे.''

महाराज सावन सिंहजींच्या अशा गोष्टींमागील गुढ अर्थाचे आम्हाला त्यावेळी ज्ञान नव्हते. त्यांच्या कृपेनेच आमची त्यांच्याशी भेट झाली. तेव्हा आम्हांस त्या माईकचे व त्या शक्तीचे ज्ञान झाले की कशातऱ्हेने आमच्या जवळात जवळ येऊन ती शक्ती आपला आवाज ऐकत असते. गुरू गोविंद सिंहजींनी देखील सांगितले आहे, ''परमात्मा हत्तीचा आवाज नंतर ऐकतो पण मुंगीचा आवाज अगोदर ऐकतो.''

न भीजै सुरती गिआन जोगि।। न भीजै सोगी कीतै रोजि।।

आपण सांगत आहात, ''सत्तावीस स्मृतींच्या पठणाने वा वेदांच्या पठणाने परमात्मा प्रसन्न होत नाही. एखाद्या विद्वानाच्या सोबत बसल्याने परमात्म्याचे आकलन होत नाही. तुम्ही असाही विचार करू नका की शोक केल्याने वा स्वत:स कस्पटासमान लेखल्याने परमात्मा प्राप्त होतो. असा तुम्ही विचार करणेही चूकीचे आहे. परमात्मा केवळ नामाचा जप केल्यानेच भेटतो.

न भीजै रूंपी माली रंगि। न भीजै तीरथि भविये नंगि।।

आपण सांगता, ''एखादा सुस्वरूप वा धनवान मनुष्य परमात्म्यास प्रसन्न करू शकत नाही. हिंदुस्थानमध्ये असा रितीरिवाज प्रचलित आहे की लोकं हिवाळ्यातील थंडीतदेखील अनवाणी पायी चालत तिर्थयात्रेसाठी जातात. असे कर्मकांड परमात्मा प्राप्तीसाठी परिणामकारक नसते. तुम्ही जर परमात्म्यास भेटू इच्छित असाल तर आपल्या हृदयात परमात्म्याप्रती प्रेमाचा संचय करा, शब्द–नामाची कमाई करा.''

न भीजै दांती कीते पुंनि।। न भीजै बाहरि बैठिआ सुंनि।।
न भीजै भैड़ि मरहि भिड़ि सूर।। न भीजै कैते होवहि धूड़।।

आता आपण प्रेमाने सांगता की तुमच्या हृदयात जर असा विचार असेल की डिसेंबर महिन्यातील कडक थंडीत घराबाहेर बसल्याने आपणांस परमात्मा प्राप्त होईल तर तसे होत नाही. आपल्या हृदयात जर असा विचार असेल की पैसे वा इतर गोष्टींचे दान केल्याने परमात्मा मिळतो, तर गुरुसाहेब सांगतात दान दिल्यानेही परमात्मा प्रसन्न होत नाही. परंतु आपणांस दानाची महानता समजून घेणे देखील गरजेचे आहे की महात्म्यांनी दान करणे का महत्वाचे मानले आहे? दान केल्याने सेवकाची कमाई सफल होते. महात्मा जाणतात की माझ्या शिष्याचे दान कोणत्या ठिकाणी वापरून पवित्र करावे? ते आपले दान गरजवंताना देतात. महात्मा आपल्या एका कवडीचेही भुकेलेले नसतात.

गुरूसाहेब सांगतात लढाईत मारणाऱ्या व मरणाऱ्या शूरवीरासही परमात्मा प्राप्त होत नाही. शब्द–नाम हाच उपाय परमात्म्यास प्राप्त करण्याचा आहे. हा शब्द–नामाचा मार्गच सच्चखण्डास जातो. त्यामुळे नामाच्या मार्गावर चालूनच आपण परमात्म्यास भेटू शकतो.

लेखा लिखीऐ मन कै भाइ।। नानक भीजै साचै नाइ।।

गुरुसाहेब आपणांस प्रेमाने सांगत आहेत,''कोणती वस्तू आपल्या उपयोगी पडेल? जेव्हा आपण आपल्या मनास इंद्रियांच्या भोगातून बाहेर काढून पवित्र करतो व नामस्मरणाद्वारे सतगुरुंना अंतर्यात प्रगट करून घेतो, तेव्हा अशा खऱ्या नामानेच परमात्मा प्रसन्न होतो. त्यास नामाची कमाईच प्रिय आहे.''

संतांना भूतकाळ, भविष्यकाळ आणि वर्तमानकाळाचे संपूर्ण ज्ञान असते. परंतु याचा ते कधीही देखावा करीत नाहीत. जगामध्ये ते एखाद्या साध्या–भोळ्या मनुष्याप्रमाणे राहतात. शिष्याद्वारेच एखाद्या घटनेचे वर्णन ऐकून ते आनंदी होतात. त्याच शब्द–ध्वनीशी तुम्हांस जोडले गेले आहे. त्यामुळे

तुम्हीदेखील ध्यान–अभ्यास करून ती शक्ती प्राप्त करून घेऊ शकता. अंतरामध्ये जाऊन तुमच्याही लक्षात येईल की संत त्यांच्या शिष्यांचा उद्धार कसा करतात? कशातऱ्हेने अंतर्यात शिष्यांचा सांभाळ करतात? व आपल्या शिष्यांसाठी कोणकोणत्या प्रकारच्या हाल–अपेष्टा सहन करतात?

प्रियजनहो! आपण संतांना आपल्या चातुर्य व युक्तिवादाच्या आधारे तेव्हाच समजावण्याचा प्रयत्न करतो जेव्हा आपण शब्द–नामाची कमाई करीत अंतर्यात जात नाही. आपण शांतचित्ताने विचार करून पहा, ज्यांना आपल्या कित्येक गतजन्मांचे ज्ञान असते, अशा संतांसमोर जाऊन आपण काय सांगू शकतो? गुरू नानक देवजी सांगतात त्यांच्या समोर जाताक्षणी वाचा बंद पडते तर मग आपण त्यांस काय सांगू शकतो?

नव छअ खट का करे विचार, निस दिन उचरे भार अठार।।
तिन भी अंत न पाया तोहे, नाम बिहूण मुक्ति क्यों होय।।

आपल्या हिंदुस्थानात हिंदू समाजात अठरा पुराणांचे खूप महत्त्व आहे. खट शास्त्र हे वेदांचेच एक भाग मानले गेले आहे. सामान्य लोकं त्यांचे पठण करण्यात व त्यांच्यावर चर्चा करण्यातच आपले जीवन व्यतीत करतात. परंतु खरंतर नामाशिवाय कोणीही मुक्ती व शांती कशी प्राप्त करू शकेल?

नाभि वस्तु ब्रह्में अंत न जाणया।।
गुरमुख नानक नाम पछाणया।।

तुम्ही अनुराग सागर पुस्तकात वाचता की विष्णूच्या नाभितून निर्माण झालेल्या कमळाचा अंतही ब्रह्मा पाहू शकला नाही, तर तो परमात्म्याचे पूर्ण ज्ञान कसे बरे प्राप्त करून शकला असता? गुरू नानक स्वत:चा अनुभव सांगतात,''गुरुमुखांनी आपल्या जीवनात परमात्म्याशी मिलाप केला व त्यांनी आपल्या शिष्यांनाही त्याचे ज्ञान दिले.'' महाराज कृपाल सांगत असत,''जे काम एक मनुष्य करू शकतो, तेच काम दुसरा मनुष्यदेखील करू शकतो.''

आपे आपि निरंजना जिनि आप उपाया।।
आपे खेल रचायन सब जगत सबाया।।

आपण परमात्म्याच्या महिमेचे वर्णन करीत आहात. परमात्म्याने या विश्वाची निर्मिती केली. सर्व जीवांना आप–आपल्या जबाबदारीनुसार त्यांच्या कामामध्ये व्यस्त केले. आपण सर्वजण परमात्म्याच्या आदेशानुसारच काम करीत असतो. परमात्मा स्वत: यापासून निर्लेप असून, जे लोक त्याच्यावर प्रेम करतात, त्यास अंतर्यात प्रगट करतात, ते लोक देखील निर्लेप होतात.

त्रय गुण आप सृजन माया मोह वधाया।।
गुरप्रसादि उबरे जिन भाणा पाया।।

आपण प्रेमाने सांगत आहात, ''परमात्म्याने स्वत:च मनुष्यामध्ये सतोगुण, रजोगुण आणि तमोगुण समाविष्ट केले. सर्वांना जन्मास घालून या जगातील वस्तूंचा मोह त्यांच्या अंतरामध्ये संचारित केला. जो मनुष्य सर्व घटीतांना परमात्म्याची इच्छा असे मानतो, तोच या जगातून मुक्त होतो.

नानक सच वरतदा सब सच समाया।।

महात्मा परमात्म्याचे प्रिय पुत्र असतात. ते पिता–परमात्म्याच्या मर्जी विरूदध कोणतेही काम करीत नाहीत. सर्व घटनांना परमात्म्याची मर्जी मानतात. दु:ख येवो, सुख येवो, ते सर्व परमात्म्याचा खेळ समजतात. त्यांचीठाम धारणा असते की जे काही होत आहे ते परमात्म्याच्या मर्जीनुसार होत असून हे सर्व आपल्या हितासाठीच होत आहे. जे परमात्म्यावर प्रेम करतात, त्याची भक्ती करतात, तेच असे म्हणू शकतात.

आपल्यासारखे जे परमात्म्याची भक्ती करीत नाहीत ते परमात्म्यामध्ये खोट काढतात की आपल्याबाबतीतच असे का घडले? असे व्हावयास नको होते. अशावेळी आपण परमात्म्याची मर्जी कसे बरे मानू शकतो? आपण जर आपले या संसारात फैलावलेले लक्ष नामस्मरणाद्वारे दोन्ही नेत्रांच्या मधोमध



एकाग्र केल्यास जगातील दु:ख–सुख सहन करण्याची शक्ती आपल्या अंतरात निर्माण होते. सर्व घटना परमात्म्याच्या आदेशानुसारच घडत असतात. आपल्याबाबतीत काही अघटीत घडल्यास, ती घटना सहन करण्याचे धैर्य आपणांस प्राप्त होते.

गुरुसाहेबांनी या छोट्याशा वाणीमध्ये अतिशय प्रेमाने सांगितले आहे की मुक्ती नामातच असते व ते नाम आपणांस सतगुरूंद्वारेच प्राप्त होते. नाम आपण लिहू–वाचू–बोलू शकत नाही. तो एक अलिखित कायदा आहे, न बोलली जाणारी भाषा आहे. नामरूपी चावी परमात्म्याच्या हातात आहे. जे भक्ती करीत परमात्म्याच्या मर्जीत राहतात, तेच परमात्म्यास स्वत:वर प्रसन्न करून घेतात.

***



सतगुरूंचे दर्शन

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे संगतसाठी एक महत्वपूर्ण संदेश,
संत बानी आश्रम, १६ पी एस राजस्थान

बंधुंनो, मी परमात्म्याचे आभार मानतो जो आम्हा जीवांसाठी या जगात मनुष्यदेह धारण करून आला आणि त्याने त्याच्या भक्तीमध्ये आपणांस रत केले. कबीर साहेब सांगतात:

जो प्रभ किए भक्त ते वांझ तिन ते सदा डराने रहिए।

तुम्ही भक्ती न करणाऱ्या लोकांपासून घाबरून दूर रहा. या संसारात संत–महात्मांची उपस्थित नाही असे कधीच घडत नाही. संत सदैव या जगात येत असतात, परंतु ज्यांच्या नशीबात असते तेच संतांपासून फायदा करून घेतात. संत या जगात मोकळ्या अंत:करणाने कृपावर्षाव करण्यासाठीच येतात, परंतु आपण सांसारिक लोकांना मुळात माहीतच नसते की संतांकडून कोणती वस्तू मागावी व कोणती वस्तू आपल्यासाठी हितकर आहे?

सामान्यत: आपण सांसारिक जीव या जग–रहाटीमध्ये गुंतलेलोआहोत आणि येथेच गुंतून राहू इच्छितो, परंतु परमात्मा आपणांस 'शब्द–नामाचा' खजिना देण्यासाठी आलेला असतो. सतगुरूंकडून कुणी अन्न–दुध मागतो, कोणी मुलगा मागतो; कुणी धन–संपत्ती तर कुणी मान–सन्मान मागतो. परंतु सतगुरूंचा खरा प्रेमी केवळ **सतगुरूंचे दर्शन** मागतो जेणेकरून त्यांचे मनमोहक स्वरूप दिसावे, ते आपल्या नेत्रांमध्ये सामावले जावे.

मनुष्य ऐषोआराम त्यागू शकतो, जगही त्यागू शकतो, खरेतर हे खूप अवघड आहे, परंतु उपवाशी राहणे देखील कठीण आहे. फरीद साहेब सांगतात:

फरीदा मौतों भुख बुरी, राती सुत्ता खाकर तड़के फेर खड़ी।

असे अनेकजण आहेत जे अन्न त्यागतात, पवनहारी (पवनाचा आहार करणारे) बनतात. मनुष्य आराम करणे सोडून देईल, जगाचे टोमणे सहजतेने

सहन करील, परंतु सतगुरूंवर प्रेम करणे खूपच अवघड असते, कारण स्वत:स एखाद्या मनुष्याच्या सुपुर्द करणे खूप अवघड आहे. आपल्या अंतरात बसलेले आपले मन अनेकदा सतगुरूंवर श्रद्धा निर्माण करते, तसेच अनेकदा त्यांच्याबद्दल अभावदेखील निर्माण करते.

महाराज सावन सिंहजी सांगत असत,''एखादा वाईट विचार देखील मनुष्यास ब्रह्मांडाच्या शिखरावरून खालती आणतो.'' आपण महिनाभर ध्यान-अभ्यास करतो. एकदा जरी आपल्या अंतरामध्ये सतगुरूंप्रती अभाव आला तर मन आपल्या महिन्याभराच्या मेहनतीवर पाणी फिरवते. फळ्यावर लिहिण्यास बराच वेळ लागतो, परंतु ते पुसण्यास मात्र काहीच वेळ लागत नाही. आपल्या मनाची हीच अवस्था आहे. ज्यांनी परमात्म्याचे मनुष्यदेहात दर्शन केले ते अत्यंत भाग्यशाली होते. पुढे आपण आपल्या भाग्याचा फायदा करून घेतो की नाही, हा आपला प्रश्न आहे. परंतु त्यांच्या बाजूने कसलीही कमतरता नसते. बुल्लेशाह सांगतात:

सतगुरु के दरबार में कमी काहूँ की नाहीं। बंदा मौज न पावी चूक चाकरी माहीं।।

जीव परमात्म्याची कृपा प्राप्त करून घेत नाही, कारण तो चाकरी करताना अनेक पळवाटा काढतो, उपकार केल्याप्रमाणे म्हणतो, हे पहा! मी सकाळी लवकर उठलो, दहा दिवस ध्यान-अभ्यास केला, तरीही माझे हे नुकसान झाले, परंतु त्यास कल्पना नसते की यातच त्याचे हित होते. जीवास जर आपले हित वा अहित कशामध्ये आहे याची कल्पना नाही तर मग तो कशासाठी तळमळत आहे? का रूदन करीत आहे?

मी नेहमी सांगतो की खरेतर माझ्यापुढे अतिशय कठीण परीक्षा होती. परंतु ही त्यांचीच कृपा होती की माझ्या सतगुरूंसमोर उभे राहून मी प्रेमाने म्हणू शकलो,''मी ना रामास पाहिले आहे ना रहिमला, ना माझा त्यापैकी कोणावर विश्वास आहे. मी तुम्हाला पाहिले आहे, माझा तुमच्यावर विश्वास बसलेला आहे. ही माझ्या अखत्यारीतील गोष्ट नव्हती. तो आत्म्याचा

आवाज होता. परमात्मा आत्म्याचा आवाज ऐकत होता. त्याच्या दरबारात कसली कमतरता होती?

गुरू गोविंद सिंहजींचे अनेक उत्तमोत्तम शिष्य होते, अनेक राजेदेखील त्यांच्याकडे येत असत. परंतु तेथे भाई नंदलालच असे होते, जे म्हणाले, ''तुझा एकच कटाक्ष, परंतु माझ्या जीवनाचा प्रश्न आहे, तुझे दर्शनच माझी नशा आहे.'' जर इतर लोकांनीही भाई नंदलाल प्रमाणेच विचार केला असता तर त्यांनी गुरूंचा त्याग केल्याचे पत्र (अविश्वासपत्र) लिहून ठेवले असते का? गुरूंनी तर तसे अविश्वासपत्र लिहीणाऱ्यांनादेखील नाम दिले होते, त्यांची जबाबदारी घेतली होती. त्या शिष्यांनी तर असे लिहून दिले होते की तुम्ही आमचे गुरू नाहीत, परंतु गुरूंनी असे लिहीले नव्हते की तुम्ही माझे शिष्य नाहीत.

आज कलियुगात जीवांची काय अवस्था आहे? त्यांचे लक्ष जगात एवढे विखुरलेले आहे की कुणालाही परमार्थाकडे येण्यासाठी फुरसत नाही. घरातून बाहेर पडल्यावर मन अनेक अडचणी निर्माण करते. ज्याच्यावर त्याची कृपा होते, ज्यास भक्तीत रस निर्माण होतो, ज्याच्या लक्षात येते की भक्तीत हे सुख आहे, भक्तीचे इतके फायदे आहेत, मग तो कितीही काम-धंद्यामध्ये व्यस्त असो वा मोकळा असो, तो भक्तीच करतो.

संत सत्संगीस नामाकडे पोहोचण्याचा मार्ग देतात व सांगतात या मार्गाने गेल्यास तू नामाकडे पोहचू शकशील. नाम गुरुंनी निर्माण केलेले असते, ते नामरूपच असतात. जे गुरूंना आपलेसे करतात त्यांची ध्यान-अभ्यासातच भक्ती येते. आपणांस हा देखील विश्वास आहे की ज्यांनी गुरूंना समजून घेतले, गुरूंवर प्रेम केले, ते गुरूंनी दिलेले कामदेखील करतील.

संत-सतगुरू आपणांस सांगतात, तुम्ही ध्यान-अभ्यास करा. शक्यतो वाईट गोष्टींपासून दूर रहा. आपले सतगुरू महाराज कृपाल सांगत असत, ''पापींची घृणा करण्याऐवजी पापांची घृणा करा.''



अनेकदा ट्रेनने प्रवास करीत असता आपले शिखबंधु धुम्रपान करण्याऱ्यांशी खूप भांडत असत. मी त्यावेळी शांत राहत असे. त्यांच्यापैकी अनेकजण मला म्हणत की, तू शिख असूनही त्यांना धुम्रपान करण्यास विरोध का करीत नाहीस? त्यावर माझ्याकडे एकच उत्तर असे की मी संपूर्ण आयुष्यभर तंबाखूची घृणा केली. त्यास स्पर्शही केला नाही. परंतु धुम्रपान करणाऱ्यांची कधीच घृणा केली नाही, कारण मी गुरू गोविंद सिंहजींचा लेख वाचला आहे की त्यांच्या घोड्यानेदेखील तंबाखूच्या शेतात प्रवेश केला नव्हता.

सांगलीच्या राजाने बाबा सावन सिंहजींना त्यांचे शेत दाखविले. जेव्हा तंबाखूचे शेत सुरू झाले, त्यामध्ये मात्र आपण पाऊलही टाकले नाही. बाबाजी म्हणाले,''आमच्या थोरल्या सतगुरूंचा घोडादेखील तंबाखूच्या शेतात गेला नव्हता. आम्ही त्याची अवज्ञा करू शकत नाही.''

महापुरुष आपणांस पापी लोकांची नव्हे, त्यांच्या पापांची घृणा करवितात. कदाचित त्यांच्या सुधारणेची जबाबदारी आपल्यावरच सोपविली जाईल. तुम्ही जे काही येथे सत्संगात ऐकले आहे, घरी गेल्यावर त्यावर नक्कीच अंमलबजावणी करावी व आपल्या घरचे कामकाजदेखील करावे. ***

शब्द

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, हुजूर स्वामीजी महाराजांची वाणी, संत बाणी आश्रम, १६ पी.एस. राजस्थान – ७ नोव्हेंबर १९८८

संत–महात्मा प्रेमाची मूर्ती असतात. ते प्रत्येक आत्म्यावर प्रेम करतात, मग भले त्या आत्म्याने त्यांच्याद्वारे नाम घेतलेले असो वा नसो. त्यांची नजर आत्म्यावर असते व जो काही वाईटपणा असतो तो आपल्या मनात असतो. संतांना सत्संगी स्वत:च्या प्राणापेक्षाही प्रिय असतात, कारण ती त्यांची अध्यात्मिक मुले असतात. पुढे जाऊन या सत्संगींपैकीच कुणीतरी त्यांचा अध्यात्मिक संपत्तीचा वारसदार बनणार असतो. संसारिक मुले केवळ या जगातील संपत्तीचे वारसदार बनू शकतात.

महाराज कृपाल पंचविस वर्षे हाच संदेश देत होते,''संतांची कुणा खास जातीशी, कुटुंबाशी किंवा देशाशी बांधिलकी नसते. ते सकल मानवजातीसाठी येतात, ते सर्वांचे हित चिंतित असतात. आता प्रश्न आपल्या श्रद्धेचा आणि प्रेमाचा असतो की आपण संतांच्या संगतीचा किती फायदा करून घेतो?'' महाराज सावन सिंहजी व गुरू नानक देवजींनी देखील हाच संदेश दिला.

सर्व संत एकच संदेश देतात की सर्व विश्वाची निर्मिती 'शब्दाने' केली असून, 'शब्दच' सर्वव्यापक आहे. प्रत्येक लहान–मोठ्या जीवामध्ये, पशु–पक्षांमध्ये हाच 'शब्द' कार्यरत असतो. 'शब्दाची' शक्तीच सर्वत्र कार्यशील आहे. हाच 'शब्द' वेळोवेळी मनुष्य शरीर धारण करून आपल्या सर्वांमध्ये येऊन राहतो, आपणांस आपल्या खऱ्या घराची माहिती देतो; आपल्या घरी परतण्याची तळमळ निर्माण करून, घरी पोहचण्यास मदतही करतो.

जे लोक नामरूपी संतांना एखाद्या विशिष्ट कुटुंबाशी बांधिलकी असलेले समजतात, त्या लोकांना मुळात संतमत समजलेलेच नसते. संतमत काय आहे याची काहीच त्यांना कल्पना नसते. 'शब्द' सर्वांच्या अंतरात असून तो

सर्वांचा दाता, सर्वांचा राजा आहे. आपण या स्थूल दुनियेच्या भौतिक जगात लहान–मोठे द्वीप–महाद्वीप पाहतो की त्यांवर सर्वप्रकारचे जीव, पशु–पक्षी, मनुष्य वास्तव्य करतात. त्याचप्रमाणे सूक्ष्म मंडळातही अशाच प्रकारची संरचना वास्तव्यात असते. जन्म–मरण तेथेदेखील आहे. हिंदू त्यास स्वर्ग तर मुसलमान त्यास बहिश्त असे म्हणतात.

साधारणत: हे धर्म आपणांस स्वर्ग वा बहिश्तचे लालूच दाखवितात की मृत्युनंतर तुम्हांस स्वर्ग लाभेल. परंतु या जागादेखील आत्म्यास राहण्यासाठी सुरक्षित नाहीत. तेथेदेखील या मंडळाप्रमाणेच ईर्षा, द्वेष आणि भोग–वासना आहेत. येथे ज्याप्रमाणे मनुष्य भोगांच्या आहारी जाऊन दु:खी होतो, काम–वासना यास मर्कटासमान नाचवित आहे, अशीच परिस्थिती स्वर्गातही आहे. प्रियजनहो! संत आपणांस यापासून सदैव सावध करतात.

क्या स्वर्ग क्या नर्क सन्तन दोऊ रादे।
हम काहूं की कान न कड़दे अपने गुर परसादे।।

संत आपल्या सेवकांना ना कधी स्वर्गाचे लालूच देतात ना नरकाची भिती घालतात. स्वर्ग–नर्क या दोघांनाही संत क्षुल्लक मानतात. संत नेहमी त्यांच्या सतगुरुंकडे दया याचना करतात की हे सतगुरु! तुम्ही आम्हांस येथून सुरक्षितपणे पार करा. स्थूल, सूक्ष्म आणि कारण या मंडळांची रचना काळाने आत्म्यांना फसविण्यासाठी केलेली आहे, ही त्यांची एक चाल आहे. संत जगात येऊन आपल्या मुलांना सावध करतात की तुम्ही काळाच्या तावडीत सापडू नका.

काळाने आपल्या स्थूल शरीरास याजगातील भोगांमध्येच गुंतवून टाकले आहे. आपणांस अंतर्यात जाऊ देत नाही. जर कुणी थोडे–फार एकाग्र होऊन अंतर्यात जात असेल तर त्यांना फसविण्यासाठी काळाने अंतरात मोठ–मोठी जाळी पसरून ठेवलेली आहेत. जे अंतर्यात जातात त्यांना जाणीव आहे की ते जाळे किती भयानक आहे? सतगुरूंच्या मदतीशिवाय

आपण ते जाळे स्वत:हून तोडू शकत नाही. तुमच्यासमोर स्वामीजी महाराजांची वाणी सादर केली जात आहे, ती तुम्ही काळजीपूर्वक ऐकावी:

गुरु मेरे जान पिरान, शब्द का दीन्हा दाना।

मी नेहमी सांगतो, ''संतमत पऱ्यांची काल्पनिक गोष्ट वा इंद्रजाल नसून, ते एक सत्य आहे आणि ते सत्यावर आधारित आहे. ज्यास संतमताची पारख करावयाची असेल त्याने सर्वप्रथम स्वत:ची पारख करावी. जो स्वत:ची पारख करतो त्यास परमेश्वरास समजून घेणे सोपे जाते. आपण सतगुरूंकडे का जावे? संतमतात गुरूंना विश्वेश्वर मानले जाते. सतगुरूंचा महिमा समजून घ्यावयाचा असल्यास आपण त्याबद्दल एखाद्या परिपूर्ण संतांस विचारावे.''

कबीर साहेब सांगतात, ''एखादा ईश्वर–धामास पोहचलेला साधुच सतगुरूंचा महिमा वर्णन करू शकतो. एखाद्या फळाच्या स्वादाबद्दल तोच मनुष्य सांगू शकतो, ज्याने त्या फळाचा आस्वाद घेतलेला आहे, खडीसाखरेच्या चवीबद्दल तोच सांगू शकतो ज्याने खडीसाखर खाल्ली आहे. ज्याने आंतरिक मंडळांमध्ये सतगुरूंचे महात्म्य पाहिले आहे, ज्याने सतगुरूंची शक्ती कशात-हेने विश्वाच्या कणा–कणामध्ये संचारून कार्यरत आहे हे अनुभवले आहे, तोच मनुष्य सतगुरूंच्या शक्तीबद्दल आपणांस वर्णन करून सांगू शकतो.''

स्वामीजी महाराज सांगतात, ''सतगुरू माझा जीव, माझे प्राण आहेत. आत्म्यास आधार देणारे सतगुरूच आहेत. त्या शक्तीचे शरीरात अस्तित्व असल्या कारणाने आपले शरीर शाबूत आहे. आपल्या अंतरामधील 'शब्द' जेव्हा खंडीत होतो, तेव्हा आत्मा शरीरास त्यागून निघून जातो.''

सतगुरूंनी मला शब्द–नामाचे दान दिलेले आहे. हे दान आपणांस कोणतेही मूल्य देऊन मिळत नाही, कोणाकडे मागून मिळत नाही, तसेच आपण हे जोर–जबरदस्तीनेही मिळवू शकत नाही. शब्दास नष्ट करण्याची शक्ती काळामध्ये नाही. शब्दास अग्नी जाळू शकत नाही, पाणी बुडवू शकत नाही, हवा उडवून नेऊ शकत नाही.

महात्मा कोणत्याही ग्रंथ–पुस्तकांवर अवलंबून नसतात. ते स्वत:चे उदाहरण स्वत:च असतात. ते जे काही बोलतात ते स्वानुभवनातूनच बोलतात. ग्रंथ–पुस्तकांबद्दल महात्म्यांच्या हृदयात खूप आदर–मान असतो, कारण ती ग्रंथ–पुस्तके नाम–अभ्यासाची कमाई केलेल्या महात्म्यांचे लिखाण असते. ते ग्रंथ–पुस्तकांचा वापर यासाठी करतात जेणेकरून आपणांस खात्री पटावी की महात्मा कोणत्याही युगात आलेले असोत, ते शब्द–नामाचाच उपदेश देत आले आहेत. गुरू नानकदेवजी सांगतात:

नाम बिना नहीं छूटस नानक, सांची तरत उतारी।

आपणांस गुरू नानकदेवजींच्या लिखाणातून लक्षात येते की ते शिष्यांना शब्द–नामाशी जोडत असत, शब्द–नामाचा प्रचार करीत असत आणि ते स्वत:ही शब्द–नामाचे स्वरूप होते.

प्रियजनहो! ख्रिस्तदेखील त्यांच्या शिष्यांना शब्द–नामाशी जोडत असत. मनुष्य अंतरात शब्द–नामाशी जोडल्या गेल्यानंतरच खरा ख्रिश्चन बनू शकतो. ज्या मंडळामध्ये ख्रिस्त राहत होते, त्या मंडळात पोहोचून, त्यांच्या शक्तीचा अनुभव घेऊनच आपण ख्रिश्चन बनू शकतो.

संत आपल्या शिष्यांना स्वत:च्या देहाशी जोडत नाहीत, तर शब्द–नामाशी जोडतात, ज्याचे अस्तित्व कायमस्वरूपी असते. एखाद्या महात्म्याने देहत्याग केल्यानंतर जे लोक म्हणतात की फक्त तेच महात्मा आपणांस मदत करतील, तर हा एक काळाने निर्माण केलेला भ्रम आहे. त्या महात्म्यांनी जर भूतांप्रमाणे येथे फेऱ्या माराव्याच्या असत्या, तर त्यांनी शब्द–नामाची कमाई करण्याची काय गरज होती?

इतिहास सांगतो की खूप उच्च कोटीचे परमात्मास्वरूपी महात्मा या जगात आले, परंतु जगाने त्यांना माफ केले नाही. त्यांच्याद्वारे फायदा करून घेण्याऐवजी, त्यांना अमानुषरितीने वेदना व त्रास दिला गेला, केवळ त्या आठवणींनीदेखील आत्मा भीतीने थरथर कापू लागतो. ख्रिस्तांच्या इतिहासात

नोंद आहे की, त्यांना काटेरी मुकुट घातला गेला, गुरू अर्जुनदेवजींना तप्त तव्यावर बसविले गेले, शम्स तबरेजजींची जिवंतपणी कातडी सोलली गेली आणि मंसुरजींचे नेत्र जिवंतपणीच काढले गेले. प्रियजनहो! या जगाने काय करायचे बाकी ठेवले? ज्यांना इतकी क्रूर वर्तणूक दिली गेली ते परमात्मास्वरूप या जगामध्ये पुन्हा-पुन्हा येतील का? ते परमात्मा स्वरूप पुन्हा परमात्म्यामध्येच जाऊन एकरूप होईल.

इतिहास साक्षी आहे की त्यावेळी परमात्म्याने ख्रिस्तास विचारले, ''तुला कोणत्या मदतीची गरज आहे? तू म्हणशील तर मी यांना तू सांगशील तसा त्रास देऊ शकतो?'' ख्रिस्त म्हणाले, ''हे परमात्मा! तू यांच्यावर कृपा कर जेणेकरून माझी खरी ओळख त्यांना होईल की माझ्या हृदयात यांच्याप्रती किती करुणा आहे.'' परमात्मा जेव्हा मंसूरला म्हणाला, ''हे लोक तुला इतक्या वेदना-त्रास देत आहेत, तू म्हणत असशील तर ही धरती उलटी-पालटी करू का?'' त्यावर मंसूर म्हणाले, ''नाही! तू या सर्वांवर कृपा कर, यांना माफ कर.''

याचप्रमाणे गुरू अर्जुनदेवजी महाराजांचा मियां मीर नामक एक प्रेमी होता. गुरू अर्जुनदेवजी महाराजांना जेव्हा तप्त तव्यावर बसविले जात होते, त्यावेळी तो म्हणाला, ''गुरूदेवजी! मला तुम्ही थोडासा इशारा करा, मी पूर्ण लाहोर उध्वस्त करू शकतो.'' गुरू अर्जुनदेवजी म्हणाले, ''मियां मीर! तसे तर मी देखील करू शकतो. परंतु महात्म्यांसाठी ही परमात्म्याची इच्छा आहे असे मानून संकटांना सामोरे जाणे व त्यावर संयमाने वागणे जरूरीचे असते.

प्रियजनहो! आपण पाहू शकता की संत आत्म्यांसाठी किती प्रेम व करूणा घेऊन येतात आणि त्यांना इतका त्रास दिला तरी ते आपल्या हिताचाच विचार करतात.

शब्द मेरा आधार, शब्द का मर्म पिछाना।।



आपण आता सांगत आहात, ''सतगुरुंनी मला दिलेल्या शब्द-नामाची मी कमाई करीत आहे. त्या शब्दाबद्दल मला ज्ञान झाले आहे की तो शब्द या सकल विश्वामध्ये व्यापलेला आहे.''

क्या गुण गाऊँ शब्द, शब्द का अगम ठिकाना।।

आपण सांगत आहात, ''मी त्या शब्द-नामाचे काय गुणगान करू? तोच शब्द (संतरुपाने) देह धारण करून या जगामध्ये येतो. त्याचे खरे वास्तव्य तर अगम देशामध्ये असते परंतु आपणांस समजावून सांगण्यासाठीच त्यांनी देह धारण केलेला असतो.''

प्रियजनहो! संतांच्या अंतरात शब्दरूपी शक्ती कार्यरत असते. ती शक्ती कधीही मरण पावत नाही. जन्म तर देह घेतो आणि देहच मरण पावतो. जो शब्द तेथे प्रगट होतो, तो अमर असतो. एखाद्या महात्म्याने भलेही आपणांस नाम दिल्यानंतर लगेच देहत्याग केला, तरी ते महात्मा वरील मंडळांमध्ये बसून जोपर्यंत त्या प्रेमीस सच्चखण्डात पोहोचवत नाहीत, तोपर्यंत त्याचा सांभाळ करतात. जगात आलेल्या दुसऱ्या महात्म्याच्या हातामध्ये ते जबाबदारी सोपवितात.

महाराज सांगत असत, ''जेव्हा एखादा बल्ब फ्युज झाल्यावर, त्याजागी दुसरा बल्ब बसविला जातो. त्यानंतरही मिळणारा प्रकाश पूर्वीप्रमाणेच असतो.'' सत्संगीसाठी तो प्रकाश सदैव जीवित असतो.

संत-महात्मा कोणत्याही आत्म्यास आपल्या शरीराशी जोडत नाहीत, ते त्यास शब्द-नामाशी जोडतात. जोपर्यंत महात्मा देहस्वरूपात असतात, तोपर्यंत ते कधीही असे म्हणत नाहीत की मी तुमचा गुरू वा पीर आहे. ते म्हणतात की तुमचा गुरू 'शब्द-नाम' आहे. हे मात्र एक सत्य आहे की जेव्हा सतगुरू देह त्यागून या जगातून निघून जातात, तेव्हा शिष्यांचे खूप मोठे नुकसान होते. त्यांच्या दर्शनामुळे आपली किती पापं आणि वाईट कर्मं नष्ट होतात, याची आपणांस जाणीव नसते. त्या फायद्यांना मात्र आपण मुकतो.

बिना शब्द सब जीव, धुँध में फिरें भरमाना।।
जल पाषान पूजत रहें, रहें कागज़ अटकाना।।

स्वामीजी महाराज सांगत आहेत, ''शब्द नामाच्या कमाई विना आपण अंधारामध्ये भरकटत आहोत. आपणांस याची कल्पना नाही की आपण कोठून आलो आहोत? यापूर्वी आपण किती योनींमध्ये जन्म घेतला? किती पत्न्या व पती आपण धारण केले? किती मुलांना आपण जन्म दिला? कोणकोणत्या देशांमध्ये आपण जन्म घेतला?'' गुरू अंगददेवजी महाराज देखील हेच सांगतात, ''नाम जपल्याने आपल्या अंतर्यात प्रकाश निर्माण होतो, अज्ञानतेचा अंध:कार नष्ट होतो.''

काळाने अशी चाल चालली आहे की आपण जेव्हा मनुष्यदेहात जन्म घेतो, तेव्हा ग्रंथांचे पठण करण्यात तो आपणांस गुंतवून टाकतो. ग्रंथांचे पठण केल्यानेच आपणांस मुक्ती मिळते असा आपला समज होतो. याचप्रमाणे आपण पाण्याचे पूजन करतो. सामान्यत: अनेक पंथ असे सांगतात की अमुक सरोवर, तलाव वा नदीत स्नान केल्यानेच आपण मुक्त होऊ शकतो.

मन मत ठोकर खाय, गये चौरासी खाना।।
बहु विधि बिपता जीव को, बिन शब्द सुनाना।।

आपण सांगता, ''शब्द नामाची कमाई न केल्याने मनाच्या मागे लागून चौऱ्याऐंशी लक्ष योनींमध्ये फिरत-फिरत, नीच श्रेणीच्या योनींमध्ये जाऊन किती कष्ट, त्रास सहन केला याचा आपण अंदाजही करू शकत नाही. इतर योनींमधील कष्ट सोडूनच द्या, तुम्ही मनुष्य-जन्माकडे पहा! हा जन्मतरी सुखी आहे का? जर थोडेफार सुख अनुभवत असू तर ते तात्पुरते आहे. त्यांचे परिवर्तन कधी दु:खात होईल हे आपणांस माहीत नाही.''

सतगुरु की सेवा बिना, नहिं लगे ठिकाना।।
शब्द भेद बिन सतगुरु, क्या कहें अजाना।।

आपण सांगत आहात की, ''चौऱ्याऐंशी लक्ष योनींमधील नीच श्रेणीच्या योनींमध्ये जाऊन आपणांस का धक्के खावे लागले? कारण आपणांस सतगुरू लाभले नाहीत किंवा लाभले असल्यास त्यांनी दिलेले नाम जपले नाही. शब्द-नामाची कमाई केली नाही, आपण सतगुरू लाभल्यानंतर त्यांची पर्वा केली नाही, अथवा आपणांस एखादे पूर्ण अभ्यासी गुरू प्राप्त झाले नाहीत, उलट वरवरचा निव्वळ कथनी जमाखर्च करणारेच गुरू भेटले.''

प्रियजनहो! गुरूत्वाचे कार्य केवळ नाम-कमाई करणाऱ्या महात्म्यांचेच असते, कारण नाम-कमाई करणारे महात्मा नामरुप झालेले असतात व केवळ तेच आपल्या आत्म्यास आधार देऊन अंतर्यात घेऊन जाऊ शकतात.

मन इन्द्री बस में नहीं, तो काल चबाना।।
राधास्वामी सरन ले, सब भाँति बचाना।।

आता आपण सांगता,''केवळ दिखाऊ गुरू आपला काय फायदा करून देणार? तो स्वत:च मन-इंद्रियांचा गुलाम असल्याने, त्यास काळाच्या जबड्यामध्ये जावे लागणार आहे. त्यामुळे जे लोक त्यास शरण जातील, ते देखील काळाच्या जबड्यामध्ये जातील. कबीर साहेब सांगतात:

अंधा गुरु ते अंधा चेला, नर्का नर्कीं धकम धकेला।।

स्वामीजी महाराज सांगत आहेत, ''परमात्म्याच्या कृपेने आपणांस पूर्ण सतगुरू लाभले. आम्ही अंत:करणापासून सतगुरूंची शरणागती घेतली आणि त्यांनीदेखील आम्हांस अनाथ मानून त्यांच्या चरणी जागा दिली.''

मी स्वत:चे सौभाग्य समजतो की मला अपार कृपेने परमात्मारूप सतगुरू कृपाल भेटले. आपण माझ्या अंतरात आपला मिलाप घडावा म्हणून मला प्रोत्साहीत केले. मी सदैव त्यांचे आभार मानतो.

***

धन्य अजायब

परम संत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणितील
संत बानी आश्रम, राजस्थान येथील सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती

परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या अपार दयेने संत बानी आश्रम, १६ पी एस राजस्थान येथे त्यांच्या मधुर आठवणीत सत्संगाचे कार्यक्रम निम्नलिखीत दिवशी आयोजित केले जात आहेत. तेव्हा सर्व बंधू–भगिनींनी महाराजजींच्या कार्यक्रमात सहभागी होऊन आश्रमातील शांत वातावरणात नामस्मरणाचा व संतवचनांचा लाभ घ्यावा ही नम्र विनंती.

२ फेब्रुवारी २०१६ ते ६ फेब्रुवारी २०१६

४ मार्च २०१६ ते ६ मार्च २०१६

३१ मार्च २०१६ ते २ एप्रिल २०१६